# PM lays foundation stone and dedicates to nation multiple projects worth more than Rs 29,400 crores in Mumbai, Maharashtra

## Lays foundation stone for Thane Borivali Twin Tunnel Project and Tunnel Work at Goregaon Mulund Link Road Project

## Lay foundation stone for Kalyan Yard Remodelling and Gati Shakti MultiModal Cargo Terminal at Navi Mumbai

## Dedicates to nation new platforms at Lokmanya Tilak Terminus and extension of platforms 10 and 11 at Chhatrapati Shivaji Maharaj Terminus Station

## Launches Mukhyamantri Yuva Karya Prashikshan Yojana with outlay of around Rs 5600 crores

## “Investors have enthusiastically welcomed the third term of the government”

## “I aim to use the power of Maharashtra to transform it into an economic powerhouse of the world; Make Mumbai the fintech capital of the world”

## “The people of the country want continuous rapid development and want to make India developed in the next 25 years”

## “Skill development and employment in large numbers is India’s need of the hour”

## “The development model of the NDA government has been to give priority to the deprived”

## “Maharashtra has propagated cultural, social and national consciousness in India”

Posted On: 13 JUL 2024

The Prime Minister, Shri Narendra Modi laid the foundation stone and dedicated to the nation multiple projects related to the road, railways and ports sector worth more than Rs Rs 29,400 crores in Mumbai, Maharashtra today.

Addressing the gathering, the Prime Minister expressed happiness for getting the opportunity to lay the foundation stones and dedicate multiple projects worth more than Rs 29,400 crores to improve road and rail connectivity between Mumbai and nearby regions. He also spoke about a huge skill development project for the youth of Maharashtra which will further boost employment opportunities in the state. The Prime Minister mentioned Vadhavan port which was recently approved by the central government. “The 76,000 crore rupees project will create more than 10 lakh jobs”, headded.

Touching upon the investor mood in Mumbai in the last one month, the Prime Minister said that both small and big investors have enthusiastically welcomed the third term of the government. He noted that a stable government will work with triple speed in its third term.

The Prime Minister remarked that Maharashtra possesses a glorious history, an empowered present and dreams of a prosperous future. Highlighting the role of the state of Maharashtra in making India a developed nation, the Prime Minister mentioned the power of industry, agriculture and the finance sector making Mumbai the financial hub of the country. “I aim to use the power of Maharashtra to transform it into an economic powerhouse of the world; Make Mumbai the fintech capital of the world.” Throwing light on Maharashtra's magnificent forts of Shivaji Maharaj, the Konkan coastline and the Sahyadri Mountain Range, Shri Modi expressed his desire for Maharashtra to scale the top spot in tourism. He also spoke about the state’s potential in medical

tourism and conference tourism. “Maharashtra is going to write a new chapter of development in India, and we are its co-travellers”, PM Modi said, underlining that today’s event is a commitment of the government to such resolutions.

Elaborating on the high aspirations of the Indian citizens in the 21st century, PM Modi reiterated the national resolution of Viksit Bharat in the next 25 years. He emphasized the role of Mumbai and Maharashtra in this journey. “It is our goal that quality of life goes up for everyone in Mumbai and Maharashtra. We are trying to improve the connectivity in the nearby areas of Mumbai”, he said. He mentioned the completion of the coastal road and Atal Setu. He informed that about 20 thousand vehicles are using Atal Setu daily, saving an estimated 20-25 lakh rupees worth of fuel. The Metro system, he said, is developing rapidly in Mumbai as the length of the Metro line increased from 8 KM a decade ago to 80 KM today and work is going on the 200 KM Metro network.

“Transformation of Indian Railways benefitting Mumbai and Maharashtra in a big way”, PM Modi said as he mentioned the redevelopment of Chhatrapati Shivaji Terminus and Nagpur station. “Today new platforms were dedicated to the nation on Chhatrapati Shivaji Terminus and Lokmanya Tilak Station enabling 24 coaches long trains to ply from there”, he added.

The Prime Minister informed that the length of National highways in Maharashtra has tripled in the last 10 years. Goregaon Mulund Link Road (GMLR) Project, he said, is a great example of nature and progress. The Thane Borivali Twin Tunnel Project will reduce the distance between Thane and Boriveli to a few minutes. The Prime Minister reiterated the government’s endeavor to develop the pilgrimage sites of the nation while also easing travel and extending services to the pilgrims. He noted that lakhs of pilgrims are taking part in Pandharpur Wari and mentioned the construction of Sant Dnyaneshwar Palkhi Marg to approximately 200 km, and Sant Tukaram Palkhi Marg to approximately 110 km to ease travel for the pilgrims. He assured that these two roads would soon become operational.

Shri Modi said that this connectivity infrastructure is helping tourism, agriculture and industry, improving employment and resting ease for women. “These works of the NDA government are empowering the poor, farmers, women power and youth power” he said, lauding the double engine government for its initiatives like skilling 10 lakh youth and scholarships under Mukhyamantri Yuva Karya Prashikhan Yojana.

“Skill development and employment in large numbers is India’s need of the hour”, the Prime Minister remarked, highlighting the record employment generation in India in the past 4-5 years despite the looming Covid pandemic. Shri Modi threw light on a recently released detailed report on employment by the Reserve Bank of India and informed that approximately 8 crore jobs have been created in the last 3-4 years, thereby silencing the critics. The Prime Minister also asked the citizens to remain cautious of the false narratives being spun against India’s development. He said that employment is created when bridges are built, railway tracks are laid, roads are constructed, and local trains are manufactured. He noted that the rate of employment in the country is directly proportional to infrastructure development.

“The development model of the NDA government has been to give priority to the deprived”, the Prime Minister emphasized, mentioning the first decision of the new government to build 3 crore houses for the poor. 4 crore families have already received houses. Lakhs of dalits and deprived in Maharashtra also benefited from the Awas Yojana. “We are committed to fulfilling the dream of owning a house for both the poor and the middle class living in cities”, he added.

He talked about the role SVANidhi Scheme is performing in restoring dignity in the life of the street vendors. He informed that about 90 lakh loans have been approved under the scheme including 13 lakhs in Maharashtra and 1.5 lakh in Mumbai itself. He quoted a study that says that the scheme has resulted in a monthly increase of 2 thousand rupees in the income of these vendors.

The Prime Minister highlighted a speciality of the SVANidhi scheme and mentioned the self-respect and power of the poor, especially the street vendors of the country who have availed bank loans under the scheme and also repaid it in time. He informed that the beneficiaries of SVANidhi scheme have so far made digital transactions worth Rs 3.25 lakh crores.

"Maharashtra has propagated cultural, social and national consciousness in India", the PrimeMinister said as he mentioned the legacies left behind by Chhatrapati Shivaji Maharaj, Babasaheb Ambedkar, Mahatma Jyotiba Phule, Savitribai Phule, Annabhau Sathe, Lokmanya Tilak and Veer Savarkar. The Prime Minister exhorted the citizens to move forward and fulfill their vision of a harmonious society and strong nation. Concluding the address, the Prime Minister urged thecitizens to keep in mind that the path to prosperity lies in harmony and amity.

Governor of Maharashtra, Shri Ramesh Bais, Chief Minister of Maharashtra, Shri Eknath Shine, Deputy Chief Ministers of Maharashtra, Shri Devendra Fadnavis and Shri Ajit Pawar, Union Minister for Commerce and Industry, Shri Piyush Goyal and Union Minister of State for Social Justice and Empowerment, Shri Ramdas Athawale were present on the occasion among others.

**Background**

The Prime Minister laid the foundation stone for Thane Borivali Tunnel Project worth Rs 16,600 crores. This Twin Tube Tunnel between Thane and Borivali alignment will pass below SanjayGandhi National Park creating a direct connection between the Western Express Highway on Borivali side and Thane Ghodbander Road on Thane side. The total length of the project is 11.8 km.It will reduce the journey from Thane to Borivali by 12 Km with a saving of about 1 hour in travel time.

The Prime Minister laid the foundation stone for Tunnel work at Goregaon Mulund Link Road (GMLR) Project worth over Rs 6300 crores. The GMLR envisages road connectivity from the Western Express Highway at Goregaon to the Eastern Express Highway at Mulund. The total lengthof the GMLR is approximately 6.65 kilometers and will provide direct connectivity for Western suburbs with the New proposed airport at Navi Mumbai and Pune Mumbai Expressway.

The Prime Minister also laid the foundation stone for Kalyan Yard Remodelling and Gati Shakti Multi-Modal Cargo Terminal at Turbhe in Navi Mumbai. Kalyan Yard will help in the segregation of long-distance and suburban traffic. The remodeling will increase the yard's capacity to handle more trains, reducing congestion and improving the efficiency of train operations. The Gati Shakti MultiModal Cargo Terminal in Navi Mumbai will be built in an area of more than 32600 sq mtrs. Itwill provide additional employment opportunities to the local people and will cater as an additional terminal for handling Cement and other commodities.

The Prime Minister dedicated the New Platforms at Lokmanya Tilak Terminus and the extension of Platforms No. 10 & 11 at Chhatrapati Shivaji Maharaj Terminus Station to the nation. The new longer platforms at Lokmanya Tilak Terminus can accommodate longer trains, make way for more passengers per train and improve the station's capacity to handle increased traffic. Platforms no. 10 & 11 at Chhatrapati Shivaji Maharaj Terminus Station have been extended by 382 meters with a cover shed and washable apron. It will help in the augmentation of the trains up to 24 coaches thus increasing the number of passengers carried.

The Prime Minister launched the Mukhyamantri Yuva Karya Prashikshan Yojana with an outlay of around Rs 5600 crores. It is a transformative internship program that addresses youth unemployment by providing opportunities for skill enhancement and industry exposure for youth aged 18 to 30 years.

The development projects launched in Mumbai today will enhance connectivity, significantly upgrade the city's infrastructure and greatly benefit its citizens

पंतप्रधानांच्या हस्ते महाराष्ट्रात मुंबई येथे २९,४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण

ठाणे बोरिवली दुहेरी भुयारी मार्ग प्रकल्प आणि गोरेगाव मुलुंड लिंक रोड प्रकल्पातील बोगद्याच्या कामाची केली पायाभरणी

नवी मुंबई येथील कल्याण यार्ड रीमॉडेलिंग आणि गति शक्ती मल्टीमॉडल कार्गो टर्मिनलची केली पायाभरणी

लोकमान्य टिळक टर्मिनस येथील नवीन फलाट आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावरील फलाट क्र. १० आणि ११ चा विस्तार राष्ट्राला केला समर्पित

सुमारे ५६०० कोटी रुपये खर्चाची मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा केला प्रारंभ

"सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाचे गुंतवणूकदारांनी उत्साहात स्वागत केले"

"महाराष्ट्राच्या सामर्थ्याचा वापर करून त्याला जगातील आर्थिक विकासाचं सर्वात मोठं शक्तीकेंद्र बनवण्याचे माझे ध्येय आहे; मुंबईला जगाची 'फिनटेक' राजधानी बनवा"

"देशातील जनतेला सातत्यपूर्ण वेगवान विकास हवा आहे आणि येत्या २५ वर्षात भारताला विकसित राष्ट्र बनवायचे आहे"

"कौशल्य विकास आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती ही भारताची काळाची गरज आहे"

"रालोआ सरकारचे विकास मॉडेल हे वंचितांना प्राधा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मुंबई येथे २९,४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या रस्ते, रेल्वे आणि बंदरे क्षेत्राशी संबंधित विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण केले.

उपस्थितांना संबोधित करताना, पंतप्रधानांनी मुंबई आणि आसपासच्या प्रदेशांमधील रस्ते आणि रेल्वे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी २९,४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण करण्याची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. महाराष्ट्रातील तरुणांसाठी विशाल कौशल्य विकास प्रकल्पाचा त्यांनी उल्लेख केला , ज्यामुळे राज्यात रोजगाराच्या संधींना आणखी चालना मिळेल. केंद्र सरकारने नुकतीच मंजुरी दिलेल्या वाढवण बंदराचा देखील पंतप्रधानांनी उल्लेख केला. "७६,००० कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे १० लाखांहून अधिक रोजगार निर्माण होतील" असे ते म्हणाले.

गेल्या एका महिन्यात मुंबईत गुंतवणूकदारांच्या उत्साहाबाबत पंतप्रधान म्हणाले की, छोट्या आणि मोठ्या गुंतवणूकदारांनी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाचे उत्साहाने स्वागत केले आहे. स्थिर सरकार तिसऱ्या कार्यकाळात तिप्पट गतीने काम करेल असे त्यांनी नमूद केले. महाराष्ट्राला गौरवशाली इतिहास, सशक्त वर्तमान आणि समृद्ध भविष्याचे स्वप्न आहे असे पंतप्रधान म्हणाले.

भारताला विकसित राष्ट्र बनवण्यात महाराष्ट्र राज्याची भूमिका अधोरेखित करताना पंतप्रधानांनी सांगितले की महाराष्ट्राकडे उद्योग, कृषी, वित्तीय क्षेत्राची ताकद आहे. त्यामुळेच महाराष्ट्र भारताचं आर्थिक केंद्र बनलं

आहे. "महाराष्ट्राच्या सामर्थ्याचा वापर करून त्याला जगातील आर्थिक विकासाचं सर्वात मोठं शक्तीकेंद्र बनवण्याचे माझे ध्येय आहे; मुंबईला जगाची फिनटेक राजधानी बनवायची आहे ." महाराष्ट्रात शिवाजी महाराजांचे भव्य किल्ले, कोकण किनारपट्टी आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगा आहेत असे सांगून मोदी यांनी महाराष्ट्र पर्यटनात देशात पहिल्या क्रमांकांचे राज्य बनावे ही आपली इच्छा असल्याचं नमूद केलं. वैद्यकीय पर्यटन आणि परिषद पर्यटनाच्या बाबतीत राज्यात मोठ्या संधी आहेत असे ते म्हणाले. " महाराष्ट्र भारतात विकासाची नवी गाथा लिहिणार आहे आणि आपण त्याचे सहप्रवासी आहोत "असे सांगत आजचा कार्यक्रम अशा संकल्पांप्रति सरकारची वचनबद्धता असल्याचे पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

२१ व्या शतकातल्या भारतीय नागरिकांच्या उच्च आकांक्षा विषद करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येत्या २५ वर्षात विकसित भारत घडवण्याच्या संकल्पाचा पुनरुच्चार केला. या प्रवासात मुंबई आणि महाराष्ट्राच्या भूमिकेवर त्यांनी भर दिला. 'मुंबई आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येकाच्या जीवनमानाचा स्तर उंचावणे हे आमचे उद्दिष्ट आहे.मुंबई लगतच्या भागात कनेक्टीव्हिटी वाढवण्याचा आमचा प्रयत्न आहे' असे पंतप्रधान म्हणाले.किनारी मार्ग आणि अटल सेतू पूर्णत्वाला जात असल्याचा त्यांनी उल्लेख केला. दिवसाला सुमारे २० हजार वाहने अटल सेतूचा उपयोग करत असल्याची माहिती देऊन सुमारे २० ते २५ लाख रुपयांच्या इंधनाची बचत होत असल्याचे ते म्हणाले. मुंबईमध्ये मेट्रोच्या जाळ्याचा झपाट्याने विकास होत असल्याचे सांगून दशकापूर्वीच्या ८ किमी लांबीच्या मार्गाचा आता ८० किमी पर्यंत विस्तार झाला आहे आणि २०० किमी मेट्रो जाळे करण्यासाठी काम सुरु आहे.

'भारतीय रेल्वेच्या कायापालटाचा मुंबई आणि महाराष्ट्राला मोठा लाभ होत आहे', असे सांगून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि नागपूर स्थानकांच्या पुनर्विकासाचा पंतप्रधानांनी उल्लेख केला. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस आणि लोकमान्य टिळक टर्मिनसचे नवे फलाट आज राष्ट्राला समर्पित करण्यात आले असून त्यामुळे २४ डब्यांची गाडीही इथून चालवली जाऊ शकते', असे पंतप्रधान म्हणाले.

गेल्या १० वर्षात महाराष्ट्रातल्या राष्ट्रीय महामार्गांची लांबी तिप्पट झाल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली. गोरेगाव-मुलुंड लिंक रोड (जीएमएलआर) प्रकल्प म्हणजे निसर्ग आणि प्रगती यांचे उत्तम उदाहरण असल्याचे ते म्हणाले. ठाणे बोरीवली दुहेरी बोगदा प्रकल्पामुळे ठाणे बोरीवली दरम्यानचे अंतर काही मिनिटात पार करता येईल.देशाच्या तीर्थस्थळांचा विकास करण्यासाठीच्या सरकारच्या प्रयत्नांचा पुनरुच्चार करतानाच भाविकांचा प्रवास सुखकर होण्यासाठी आणि सेवांमध्ये वाढ करण्याचाही सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. पंढरपुरच्या वारीमध्ये लाखो वारकरी सहभागी होत असल्याचे सांगून भाविकांच्या सोयीसाठी सुमारे २०० किमीचा संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग आणि सुमारे ११० किमीचा संत तुकाराम पालखी मार्ग बांधण्यात येत असल्याचा त्यांनी उल्लेख केला. हे दोन्ही मार्ग लवकरच कार्यान्वित होतील असे आश्वासन त्यांनी दिले.

कनेक्टीव्हिटीसंदर्भातल्या पायाभूत सुविधांमुळे पर्यटन,कृषी आणि उद्योग क्षेत्राला त्याचा लाभ होत असून रोजगारात वृद्धी होण्याबरोबरच महिलांसाठीही सोयीचे होत असल्याचे पंतप्रधान म्हणाले. 'रालोआसरकारची ही विकास कामे गरीब,शेतकरी,महिला शक्ती आणि युवा शक्तीचे सबलीकरण करत आहे', असे ते म्हणाले. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत १० लाख युवकांना कौशल्य विकास आणि स्कॉलरशिप देण्यासारख्या उपक्रमांसाठी त्यांनी दुहेरी इंजिन सरकारची प्रशंसा केली.

'कौशल्य विकास आणि मोठ्या प्रमाणात रोजगार ही भारताची सध्याच्या काळाची गरज आहे', असे सांगतानाच कोविड महामारीसारखा काळ येऊनही गेल्या ४-५ वर्षात भारतातली विक्रमी रोजगार निर्मिती त्यांनी अधोरेखित केली. रिझर्व बँक ऑफ इंडियाने रोजगाराबाबत नुकताच प्रकाशित केलेल्या तपशीलवार अहवालावर प्रकाश टाकत गेल्या ३-४ वर्षात सुमारे ८ कोटी रोजगारांची निर्मिती झाल्याची माहिती देत त्यामुळे टीकाकारांची तोंडे बंद झाली आहेत.भारताच्या विकासाबाबत गैरसमज पसरवले जात असल्याबाबत नागरिकांनी दक्ष राहावे असे आवाहनही त्यांनी केले. पूल बांधले जातात,रेल्वे मार्ग तयार केले जातात,रस्ते बांधले जातात आणि लोकल

गाड्या तयार केल्या जातात तेव्हाच रोजगार निर्मिती होते.देशातला रोजगार निर्मितीचा दर ,पायाभूत सुविधा विकासाच्या थेट प्रमाणावर अवलंबून असतो असे ते म्हणाले.

गरिबांसाठी ३ कोटी घरे बांधण्याच्या नवीन सरकारच्या पहिल्या निर्णयाचा उल्लेख करून "एनडीए सरकारचे विकास मॉडेल वंचितांना प्राधान्य देण्याचे आहे" यावर पंतप्रधानांनी भर दिला. ४ कोटी कुटुंबांना यापूर्वीच घरे मिळाली आहेत. महाराष्ट्रातील लाखो दलित आणि वंचितांनाही आवास योजनेचा लाभ मिळाला आहे. "स्वतःच्या मालकीचे घर असावे हे शहरांमध्ये राहणाऱ्या गरीब आणि मध्यमवर्गीयांचे स्वप्न साकार करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत," असेही त्यांनी उद्धृत केले.

फेरीवाल्यांनाही आत्मसन्मानाने जगता यावे यासाठी स्वनिधी योजना बजावत असलेल्या भूमिकेविषयी त्यांनी अवगत केले. या योजनेंतर्गत महाराष्ट्रात १३ लाख आणि एकट्या मुंबईतच दीड लाख अशी एकूण ९० लाख कर्जे मंजूर झाल्याची माहिती त्यांनी दिली. या योजनेमुळे या विक्रेत्यांचे मासिक उत्पन्न २ हजार रुपयांनी वाढल्याचे एका अभ्यासाचा हवाला देत त्यांनी नमूद केले.

पंतप्रधानांनी स्वनिधी योजनेचे एक वैशिष्ट्य अधोरेखित केले आणि गरिबांच्या विशेषतः या योजनेंतर्गत बँकेकडून कर्ज घेऊन त्याची परतफेड विहित मुदतीत केलेल्या फेरीवाल्यांच्या स्वाभिमान आणि सामर्थ्याची दखल घेतली. स्वनिधी योजनेच्या लाभार्थ्यांनी आतापर्यंत ३.२५ लाख कोटी रुपयांचे डिजिटल व्यवहार केल्याची माहिती त्यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक आणि वीर सावरकर यांनी जनतेला दिलेल्या वारशाचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले, "महाराष्ट्राने भारतामध्ये सांस्कृतिक, सामाजिक आणि राष्ट्रीय जाणीवेचा प्रसार केला आहे." पंतप्रधानांनी नागरिकांना पुढाकार घेऊन सुसंवादी समाज आणि सशक्त राष्ट्राचे त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याचे आवाहन केले. समृद्धीचा मार्ग सुसंवाद आणि सौहार्दात आहे हे नागरिकांनी ध्यानात ठेवण्याचे आवाहन करून पंतप्रधानांनी भाषणाचा समारोप केला.

महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल आणि केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले आदि यावेळी उपस्थित होते.

**पार्श्वभूमी**

पंतप्रधानांनी १६,६०० कोटी रुपयांच्या ठाणे - बोरिवली बोगद्याच्या प्रकल्पाची पायाभरणी केली. ठाणे आणि बोरिवली दरम्यानचा हा दुहेरी ट्यूब बोगदा संजय गांधी नॅशनल पार्कच्या खालून जाईल, ज्यामुळे बोरिवलीच्या दिशेने पश्चिम द्रुतगती महामार्ग आणि ठाणे बाजूला ठाणे घोडबंदर रोड दरम्यान थेट संपर्क व्यवस्था निर्माण होईल. या प्रकल्पाची एकूण लांबी ११.८ किमी आहे. यामुळे ठाणे ते बोरिवली हा प्रवास १२ किमीने कमी होणार असून प्रवासाच्या वेळेत सुमारे १ तासाची बचत होईल.

पंतप्रधानांनी गोरेगाव मुलुंड लिंक रोड (जी एम एल आर ) प्रकल्पात ६३०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या बोगद्याच्या कामाची पायाभरणी केली. गोरेगाव येथील पश्चिम द्रुतगती महामार्ग ते मुलुंड येथील पूर्व द्रुतगती महामार्गा दरम्यान रस्ता जोडणे ही जी एम एल आर प्रकल्पाची कल्पना आहे. या रस्ता प्रकल्पाची एकूण लांबी अंदाजे ६.६५ किलोमीटर आहे आणि पश्चिम उपनगरांना नवी मुंबई येथील नवीन प्रस्तावित विमानतळाशी आणि पुणे मुंबई द्रुतगती मार्गाशी थेट जोडण्याचे काम हा रस्ता करेल.

पंतप्रधानांनी नवी मुंबईतील तुर्भे येथे कल्याण यार्डाच्या पुनर्रचनेची आणि गतिशक्ती मल्टी-मोडल कार्गो टर्मिनलची पायाभरणीही केली. कल्याण यार्डामुळे लांब पल्ल्याच्या आणि उपनगरीय वाहतुकीचे पृथक्करण होण्यास मदत होणार आहे . पुनर्रचनेमुळे अधिक गाड्या हाताळण्याची यार्डाची क्षमता वाढेल, गर्दी कमी होईल आणि गाड्यांची परिचालनक्षमता सुधारेल. नवी मुंबईतील गतिशक्ती मल्टीमोडल कार्गो टर्मिनल ३२,६०० चौरस

मीटरपेक्षा जास्त क्षेत्रावर बांधले जाणार आहे. हे स्थानिक लोकांसाठी अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देईल तसेच सिमेंट आणि इतर वस्तूंच्या हाताळणीसाठी अतिरिक्त टर्मिनल म्हणून काम करेल.

पंतप्रधानांनी लोकमान्य टिळक टर्मिनस येथील नवीन फलाटांचे आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावरील फलाट क्र. १० आणि ११ यांचे लोकार्पण केले . लोकमान्य टिळक टर्मिनसवरील नवीन लांबलचक फलाटांमुळे अधिक लांब रेल्वेगाड्या उभ्या राहू शकतात, प्रत्येक गाडीत अधिक प्रवासी सामावू शकतात आणि वाढीव रहदारी हाताळण्यासाठी स्थानकाची क्षमता सुधारू शकते. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकातील फलाट क्र.१० आणि ११ यांची लांबी ३८२ मीटरने वाढवण्यात आली असून या भागावर सावलीसाठी आच्छादन तसेच गाडी धुण्याच्या दृष्टीने या भागातील रेल्वे रुळांवर विशेष सोय देखील केलेली आहे. या विस्तारामुळे या फलाटाची क्षमता तब्बल २४ डब्यांपर्यंतच्या गाड्या उभ्या करण्याची होईल , त्यामुळे प्रवाशांची संख्या वाढण्यास मदत होईल.

पंतप्रधानांनी सुमारे ५६०० कोटी रुपयांच्या खर्चाची मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली. हा एक परिवर्तनशील अंतर्वासिता कार्यक्रम असून तो तरुणांमधील बेरोजगारीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने १८ ते ३० या वयोगटातील तरुणांना कौशल्य वाढीच्या आणि उद्योगाभिमुखतेच्या संधी देतो.








(₹ 6,300 कोटी)




मुख्यमंत्री, महाराष्ट्र
न्याय आणि हक्क


महानगरपालिका
प्रकल्प (तिसरा टप्पा) अंतर्गत जुळ्या
कामाचे भूमिपूजन
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
उपस्थिती
रमेश बैस
महाराष्ट्र
गोरेगांव-मुलुंड लिंक रोड
जुड़वां सुरंग का
श्री नरेंद्र
प्रधानमंत्री
गरिमामयी
राज्यपाल, महार
मुख्यमंत्री, महाराष्ट्र
केंद्रीय रेल, सूचना एवं प्रसारण,
इलेक्ट्रॉनिक्स एवं सूचना प्रौद्योगिकी मंत्रालय
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र


₹ 29,000 कोटी
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता प्रकल्पांतर्गत
दुहेरी बोगद्याचे भूमिपूजन
(₹ 6,300 कोटी)